आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२ ऑक्टोबर २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- आदिवासी समाजाची प्रगती झाली तरच देशाची प्रगती होईल या गांधीजींच्या वचनानुसार केंद्र सरकार कार्यरत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त देशाची आदरांजली

- स्वच्छ भारत अभियानाच्या दशकपूर्ती निमित्त संयुक्त राष्ट्रांसह विविध जागतिक संघटना आणि नेत्यांकडून प्रशंसा

- बिहारमधे आणखी काही भागांना पुराचा तडाखा, पूरग्रस्तांची संख्या १५ लाखावर

**आणि**

- पहिली खो-खो विश्वचषक स्पर्धा पुढच्या वर्षी भारतात होणार

**<><><><><>**

आदिवासी समाजाची वेगानं प्रगती झाली तरच देशाची प्रगती होईल या महात्मा गांधींच्या वचनानुसार केंद्र सरकार कार्य करत आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज झारखंडमध्ये हजारीबाग इथं सुमारे ८३ हजार ३०० कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांची पायाभरणी, लोकार्पण आणि उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. झारखंडच्या सर्वांगीण विकासाकरता केंद्रसरकार वचनबद्ध आहे, भाजपाची परिवर्तन यात्रा म्हणजे झारखंडच्या विकासाची संकल्प यात्रा आहे, असं त्यांनी सांगितलं.

यावेळी प्रधानमंत्र्याच्या हस्ते ७९ हजार १५० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या 'धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानाचा' देखील प्रारंभ झाला. देशभरातल्या आदिवासी समुदायांचा सर्वसमावेशक आणि सर्वांगीण विकास हा या

अभियानाचा उद्देश आहे. याशिवाय प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आदिवासी समुदायांसाठी शैक्षणिक पायाभूत सुविधांना चालना देणाऱ्या  40 एकलव्य आदर्श निवासी शाळांचं उदघाटन, तसंच 2 हजार 800 कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या 25 एकलव्य आदर्श निवासी शाळांची पायाभरणी झाली.

**<><><><><>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आज देशानं त्यांना आदरांजली वाहिली. महात्मा गांधी यांची आज १५५ वी जयंती आहे. त्यानिमित्त देशासह परदेशातही विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि इतर केंद्रीय मंत्र्यांनी नवी दिल्लीत गांधीजींच्या राजघाट इथल्या समाधीस्थळी पुष्पांजली अर्पण केली. त्यानंतर त्यांनी विजयघाट इथं शास्त्रीजींना आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

गांधी जयंतीनिमित्त आज सर्वत्र स्वच्छता दिवस साजरा करण्यात आला. स्वच्छ भारत अभियानाला दहा वर्ष पूर्ण झाल्या निमित्त नवी दिल्ली इथं आयोजित कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांसमवेत भाग घेतला. यावेळी स्वच्छतेशी संबंधित नऊ हजार सहाशे कोटी रुपयांच्या अनेक प्रकल्पांचा प्रारंभ त्यांच्या हस्ते झाला. यात अमृत प्रकल्प स्वच्छ गंगा राष्ट्रीय अभियान आणि गोबरधन योजनेअंतर्गत १५ बायोगॅस प्रकल्पांचा समावेश आहे.

अमृत-२ योजनेंतर्गत सातारा पालिकेच्या  स्वयंचलित पाणीपुरवठा प्रकल्पाचं तसंच नळजोडण्यांना  अद्ययावत मीटर बसवण्याच्या  कामाचं उद्घाटनही मोदी यांनी

दूरस्थ पद्धतीनं केलं. स्वच्छता ही प्रत्येकाची जबाबदारी असून यासाठी प्रत्येकानं कार्यरत राहणं गरजेचं आहे, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

मध्य रेल्वे विभागानं ‘ स्वच्छता ही सेवा ‘ उपक्रमांतर्गत राबवलेल्या स्वच्छता पंधरवड्याची आज सांगता झाली. या पंधरवड्यात मध्य रेल्वेनं स्वच्छतेशी संबंधित विविध उपक्रम राबवले.

**<><><><><>**

स्वच्छता अभियानात सहभागी झालेल्या जळगावच्या सपना कोळी हिनं सांगितलं…

**होल्ड बाईट -**

**<><><><><>**

स्वच्छ भारत अभियानाला दहा वर्ष पूर्ण झाल्याबद्दल विविध जागतिक नेते आणि संघटनांनी प्रशंसा केली आहे. स्वच्छ भारत अभियान या परिवर्तनशील उपक्रमाच्या माध्यमातून शाश्वत विकासाची उद्दिष्टे गाठण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आणि केंद्र सरकारनं उचलेल्या महत्त्वाच्या पावलांबद्दल जागतिक आरोग्य संघटनेचे महासंचालक टेड्रॉस अधानॉम घेब्रेयेसुसन यांनी आज गौरवोद्गार काढले. अधिक स्वच्छ आणि निरोगी देशाला चालना देण्यासाठी या मोहिमेनं जनतेला उद्युक्त केलं असं ते म्हणाले.

शौचालयांच्या उपलब्धतेबाबत सुधारणा झाल्यामुळे स्वच्छता अभियानानं भारतात लक्षणीय बदल घडवून आणला असल्याचं जागतिक बँकेचे अध्यक्ष अजय बंगा यांनी म्हटलं आहे.

आशियाई विकास बँकेचे अध्यक्ष मत्साग आसाकावा यांनी म्हटलंय की या द्रष्ट्या योजनेच्या अगदी प्रारंभापासून भारताशी आपली भागीदारी असल्याचा बँकेला अभिमान वाटतो. टाटा ट्रस्टचे अध्यक्ष रतन टाटा आणि मायक्रोसॉफ्टचे संस्थापक बिल गेट्स यांनीही मोदी यांचं अभिनंदन केलं आहे. शौचालय आणि आरोग्यावर

स्वच्छ भारत अभियानाचा झालेला परिणाम विलक्षण असल्याचं बिल गेट्स यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

बिहारमधे, पुराच्या तडाख्यात आज आणखी काही भाग आल्यानं पूरग्रस्तांची संख्या सुमारे १५ लाख झाली आहे. कोसी, गंडक, महानंदा, कमलाबालन, बागमती, आणि इतर नद्यांची पाणीपातळी वाढली असून, राज्यातल्या इतर सखल भागातही ते पसरलं आहे. सीतमढी, दरभंगा, पश्चिम चंपारण, मधुबनी, सुपौल आणि सहर्सा या भागांना जास्त तडाखा बसला आहे. पूर्णिया, अररिया, मधेपूरा, आणि किशनगंज जिल्ह्यांमधल्या अनेक गावांमधेही पुराचं पाणी शिरलं आहे.

जलजन्य आजाराचा फैलाव रोखण्यासाठी पूरग्रस्त भागात बोट ॲम्ब्युलन्स तैनात केल्या आहेत. राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती निवारण दलांनी आतापर्यंत अडीच लाख लोकांना पुरग्रस्त भागातून बाहेर काढलं आहे. पुराचा जोर मोठा असल्यानं अनेक रस्ते, वीजपुरवठा वाहिन्या आणि इतर पायाभूत सुविधांना मोठी हानी पोचली आहे.

**<><><><><>**

खो -खो या देशी खेळाची पहिली विश्वचषक स्पर्धा पुढच्या वर्षी भारतात होईल, असं भारतीय खो- खो महासंघ आणि आंतरराष्ट्रीय खो- खो महासंघानं आज जाहीर केलं. ५४ देशांमध्ये हा खेळ खेळला जातो, या स्पर्धेत मात्र ६ खंडातले २४ देशांतले १६ पुरुष संघ आणि तितकेच महिला संघ सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा आठवडाभर चालेल. या स्पर्धेमुळे या खेळाला असलेल्या समृद्ध वारशाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली जाणार आहे. आधी मातीत खेळला जाणारा हा खेळ आता मॅटवर खेळला जातो. या स्पर्धेच्या निमित्तानं भारतीय महासंघ १० शहरांमधल्या २०० शाळांमधे सदस्यत्व मोहीम राबवणार आहे.

<><><><><>

इंटरनॅशनल शूटिंग स्पोर्ट फेडरेशनतर्फे आयोजित ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशिप नेमबाजी स्पर्धेत महिलांच्या २५ मीटर पिस्तुल प्रकारात भारताच्या दिवांशी हिने सुवर्ण पदक पटकावलं. तसंच, भारताच्या तेजस्विनी, दिवांशी आणि विभूती भाटिया यांनी महिलांच्या २५ मीटर पिस्तुल स्पर्धेच्या सांघिक प्रकारात देखील सुवर्ण पदकाची कमाई केली. सध्या या स्पर्धेत भारत १० सुवर्ण, एक रौप्य आणि तीन कांस्यपदक अशा १४ पदकांसह पदकतालिकेत आघाडीवर आहे.

<><><><><>

हरयाणात विधानसभा निवडणुकीच्या अंतिम टप्प्याचा प्रचार आज शिगेला पोहोचला. विविध राजकीय पक्षांच्या प्रचारसभा झाल्या. काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी यांनी भिवानी जिल्ह्यात भवानी खेरा आणि  जिंद जिल्ह्यात जुलाना इथं तर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी छाकरी दादरी इथं प्रचारसभा घेतल्या. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर आणि खासदार हेमा मालिनी यांनी कुरूक्षेत्रातल्या तीन मतदारसंघात प्रचार केला. आमआदमी पक्षाचे ज्येष्ठ नेते मनिष सिसोदिया यांनी हिसार आणि अधमपूरमधल्या पक्ष उमेदवारांसाठी रोड शो घेतला.  पंजाबचे मंत्री हरपाल सिंग छिमा यांनी फतेहबादला प्रचार केला. उद्या संध्याकाळी प्रचार संपेल.

<><><><><>

उत्तरप्रदेशात बरेली जिल्ह्यातल्या बेकायदेशीर फटाका कारखान्यात आज झालेल्या स्फोटात पाचजणांचा मृत्यू झाला. तर अनेकजण जखमी झाले. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या दुर्घटनेची दखल घेत, मदत आणि बचाव कार्याल गती देण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. या स्फोटामुळे किमान ८ घरं

कोसळली असल्यानं ढिगाऱ्याखाली बरेच लोक अडकली असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

<><><><><>

संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अन्तोनिओ गुतेरेस यांना इस्त्रायलमधे प्रवेशाला अधिकृतपणे बंदी घातल्याचं आज इस्त्रालयचे परराष्ट्र मंत्री ईसराइल कात्झ यांनी जाहीर केलं. इस्त्रालय आणि इराणमधे अलीकडे निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. इराणनं इस्त्रायलवर मंगळवारी रात्री केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्याचा स्पष्ट शब्दात निषेध न करणाऱ्यांना इस्त्रालयचा दौरा करण्याचा हक्क नाही असं कात्झ यांनी म्हटलं आहे.  या हल्ल्यानंतर मध्य पूर्वेतल्या वाढत्या संघर्षाबद्दल गुतेरेस यांनी चिंता व्यक्त केली होती.

<><><><><>

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या  शांती आणि अहिंसेबाबतच्या  तत्वांचा प्रसार करण्यासाठी नाशिक मध्यवर्ती कारागृहानं कैंद्यासांठी १ ऑक्टोबरला परीक्षा आयोजित केली होती. या कारागृहातल्या ८० कैद्यांसह ८ तुरुंग अधिकाऱ्यांनी ही परीक्षा  दिली असल्याचं सूत्रांनी सांगितलं. ही परीक्षा देणाऱ्या कैद्यांमध्ये  १० महिला कैद्यांचाही समावेश आहे.

<><><><><>

पुढच्या सात दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

//<><><><><>//